संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# मुंबई विद्यापीठ गैरकारभाराचा विश्वविक्रम

मुंबई विद्यापीठाच्या कारभाराचे सरासरी दर महिन्याला काही ना काही धिंडवडे निघत असतात. ज्यांना कोणालाही गैरव्यवस्थापन आणि गैरव्यवहाराची पदवी, पदविका, डॉक्टरेट मिळवायची त्यांच्यासाठी मुंबई विद्यापीठाइतके चांगले उदाहरण दुसरे कुठेही सापडणार नाही. अगदी अलीकडेच या विद्यापीठाचे महामहीम कुलगुरू संजय देशमुख यांनी मुंबई विद्यापीठाचा झेंडा अटकेपार जात असल्याची दवंडी दिली. मुंबई विद्यापीठाची अमेरिकेत शाखा उघडली जाणार आहे, त्यासाठी नेहमीप्रमाणे कोट्यवधी रुपये खर्चून जागा खरेदी केली जाईल. ज्या विद्यार्थ्यांना अमेरिकेत जाऊन त्या दर्जाचे शिक्षण घ्यायचे असेल तिथे त्यांची तिथे व्यवस्था तर होईलच. शिवाय अमेरिकेतल्या विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठातून शिक्षण देण्याचा मार्ग उपलब्ध होईल. मुंबई विद्यापीठाची हनुमान उडी म्हणजे आपल्या शेपटीला लागलेली आग विझवण्याऐवजी ती मशाल आहे, हे समजून भागंभाग करण्याचा प्रकार ठरतो. आपल्याच देशात आपले विद्यापीठ कसे दर्जेदार ठरेल, जगभरातल्या विद्यापीठांचे किंवा अभ्यासकांचे ते कसे आकर्षण ठरेल, असा कोणताही प्रयत्न न करता अमेरिकेत शाखा सुरू करण्याचा प्रकार हास्यास्पद वाटू लागतो. कारण जो विद्यापीठ परदेशात किंवा अमेरिकेसारख्या भारतातला कारभार किती निकृष्ट आहे, याची एक नाही दोन नाही तर शंभरावर उदाहरणे सहजपणे देता येतील. प्रगत देशात शाखा उघडल्याने मुंबई विद्यापीठही प्रगत होईल, अशा कुठल्या समजुतीत हे महाकठीण कुलगुरू असतील तर त्यांनी कठोर आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. मुंबई विद्यापीठाच्या केवळ सावळ्या नव्हे तर बावळ्या गोंधळाचा ताजा नमुना पाहिला तर कुणाही शिक्षणप्रेमीची, प्रत्येक विद्यार्थी आणि पालकाची तळपायाची आग मस्तकात गेल्याशिवाय राहणार नाही. जेव्हा विद्यार्थी आपल्या आयुष्यातील शिक्षणाचा शेवटचा टप्पा विद्यापीठ स्तरावर पूर्ण करतो. तेव्हा तो त्या विद्यापीठाची प्रत्येक परीक्षा शक्य तितक्या तळमळीने कठोर परिश्रमाने उत्तीर्ण होण्यासाठीच देत असतो. परंतु, गेल्या दोन वर्षांत मुंबई विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांमधल्या उत्तरपत्रिका तपासणीतला अतिशय गंभीर असा निष्काळजीपणा चव्हाट्यावर आला आहे.

### ७३ हजार विद्यार्थी नापासाचे पास

गेल्या तीन वर्षांत म्हणजे २०१४, २०१५ आणि २०१६ या तीन वर्षांत ज्या परीक्षा झाल्या. त्यात साडेतीन लाख विद्यार्थ्यांनी परीक्षा दिल्या. त्याचे या तीन वर्षांत जे निकाल लागले, त्यातील सव्वा लाख विद्यार्थ्यांनी पुनर्मूल्यांकनासाठी म्हणजे पुन्हा पेपर तपासणीसाठी अर्ज केले होते. या सव्वा लाख विद्यार्थ्यपैकी तब्बल ७३ हजार विद्यार्थी उत्तीर्ण झाले. म्हणजे ७३ हजार विद्यार्थ्यांना चुकीने नापास करण्याचा जागतिक विक्रम मुंबई विद्यापीठाने केला आहे. याबद्दल या विद्यापीठाचा जाहीर सत्कार करायला हवा. अशी ख्याती आणि नावलौकिक असलेल्या विद्यापीठाने अमेरिकेत शाखा उघडण्याची शेखी मिरवावी, याकरिता दुसरा आणखी कोणता विनोद असू शकतो. एके काळी ज्या मुंबई विद्यापीठाचा एक विशेष दर्जा होता, या विद्यापीठाचे आपण विद्यार्थी आहोत, हे सांगताना विद्यार्थ्यांनाही अभिमान वाटायचा. आता तो दर्जा घसरलेला आहे. गैरव्यवस्थापन ही याची नवी खास ओळख झाली आहे. एवढा मोठा प्रकार घडूनही या महानगरातले किंवा या विद्यापीठाशी संबंधित कोणीही निषेधाचा शब्द उच्चारलेला नाही. जणू काही फार विशेष काही घडलेले नाही, अशा थाटात सगळ्या आघाड्यांवर सामसूम आहे. एरवी विद्यापीठात थोडे काही चित्रविचित्र घडले की, मोर्चे काढून आपली ताकद दाखवणाऱ्या किंवा राष्ट्रवादाचे अवसान आणून ज्ञान चारित्र्याची दवंडी देण्याच्या विद्यार्थी संघटनाही दीर्घकालीन रजेवर गेल्यासारख्या शांत आहेत. आता यापुढे कदाचित येत्या वर्षातच विद्यापीठात निवडणुकांचा धुमाकूळ सुरू होईल, तेव्हा सर्व राजकीय पक्ष या विद्याभ्यासाच्या दालनाला आपला राजकीय आखाडा बनवतील. विद्यार्थ्यांमधले नेतृत्वगुण विकसित व्हावेत. चांगले नेते निर्माण व्हावेत, म्हणून विद्यापीठ निवडणुका आवश्यक असल्याचे हे नेते ढोल बडवत आहेत. परंतु, विद्यापीठात दक्ष, अभ्यासू अष्टपैलू, विविध विषयांचा ध्यास घेतलेल्या विद्यार्थ्यांची गरज आहे. अभ्यासाऐवजी केवळ दबंगगिरी करण्यासाठी विद्यापीठ नाही. ज्या वयात अभ्यासाचा ध्यास विद्यार्थ्यांनी घ्यायला हवा किंवा उमेदीच्या काळात ते विद्यार्थी सर्व प्रकारचे परिश्रम घेऊन आपले भविष्य साकारण्याचा प्रयत्न करतात, त्या वयात त्यांना अनावश्यक खरे तर त्यांच्या भविष्याच्या वाटचालीपासून भरकटवले जाते. याउलट विद्यापीठ म्हणजे विद्यार्थी-शिक्षण-प्राध्यापक-पालक, समाजातील अभ्यासक, तज्ज्ञ विचारवंत यांच्या हक्काचं व्यासपीठ ठरले पाहिजे. आज त्याच विद्यापीठाच्या गैरव्यवस्थापनाची बजबजपुरी माजली आहे. त्यामुळे विद्यार्थी सैरभैर असतो. त्याला आपण केलेल्या अभ्यासाचे योग्य मूल्यांकन होईल की नाही याबद्दल खात्री वाटत नाही. विद्यार्थ्यांना मनात जर या सर्वोच्च संस्थेविषयी अविश्वास वाटत असेल, तर त्या संस्थेच्या कारभारात किती मूलभूत सुधारणा करण्याची गरज आहे, हे सिध्द होते.

### कुलगुरुंनी माफी मागावी

सव्वा लाख विद्यार्थ्यांनी आपण दिलेल्या उत्तरपत्रिकांच्या पुनर्मूल्यांकनासाठी किंवा पुनर्तपासणीसाठी अर्ज करावा, ही गोष्ट खूप धक्कादायक ठरते. त्यात अभियांत्रिकी शाखेचे सर्वाधिक म्हणजे ३५ हजार विद्यार्थ्यांचे अर्ज होते. हादेखील विद्यापीठाच्या इतिहासातील एक उच्चांक ठरतो. या पुनर्मूल्यांकनापोटी विद्यापीठाची पाच कोटींची कमाई झाली. परंतु, अप्रतिष्ठा झाल्याचे कोणतेही सोयरसुतक विद्यापीठाला वाटत नाही. या झाल्या प्रकाराबद्दल कुलगुरुंनी एका शब्दानेही दिलगिरी व्यक्त केलेली नाही. जर या विद्यार्थ्यांना असे पुनर्तपासणीचे अर्ज करण्याची संधीच मिळाली नसती किंवा त्यांनी विद्यापीठाच्या कारभारावर विश्वास ठेवून अर्जच केले नसते, तर या ७३ हजार विद्यार्थ्यांचे किती नुकसान झाले असते, याची त्याच क्षणी जाणीव होते. केवळ पेपर तपासणीतल्या ढिसाळ आणि बेजबाबदारपणाने लाखभर विद्यार्थ्यांना नापास ठरवले जात असेल तर त्याची कसून चौकशी झाली पाहिजे. कुलगुरुंनी विद्यार्थ्यांची, पालकांची माफी मागितली पाहिजे. कामचुकारपणा करणाऱ्या परीक्षकांचीदेखील चौकशी झाली पाहिजे, तरच हे गौडबंगाल थांबेल.